# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रा.डॉ. गणेश भामे**
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१५४ दि. १६/०७/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी वर्ष व महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष' निमित्त आयोजित निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत...

संदर्भ : १.मा. व्यवस्थापकीय संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांचे जा. क्र.डॉ.बा.आं.स.प्र.नाग./कार्यक्रम/निंबध स्पर्धेचे/आस्था/२३२/२०२६–२७, दि.१०/०७/२०२६ रोजीचे पत्र

२. मा.कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र.व्हीसी ३९५९, दि.१४ जुलै २०२६ रोजी अग्रेषित

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर ही संस्था सामाजिक न्याय विभागाचा सार्वजनिक न्याय विभागाचा सार्वजनिक उपक्रम आहे. मार्च, २०२७ मध्ये महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला १०० वर्ष पूर्ण होत आहे. तसेच क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे होत आहे. यानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्यावतीने 'महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह (२० मार्च १९२७) शताब्दी' निमित्ताने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थ्यांना सदर निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत प्रोत्साहीत करावे. या निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान विभागाच्या **https://dbaspratishthan.in/** या संकेतस्थळावर माहे सप्टेंबर २०२६ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीमध्ये ऑनलाईन नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच आपल्या महाविद्यालयातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे. सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. व्यवस्थापकीय संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांचे पत्र

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 235
दिनांक: 14 JUL 2026

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 14 JUL 2026
आवक क्रमांक नोंदणी 3959
जावक दिनांक 14 JUL 2026

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर


(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सार्वजनिक उपक्रम)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, २ रा माळा ए-विंग, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर, दीक्षा भूमी रोड, नागपूर - ४४० ०२२
CIN : U74999MH2017NPL297149
दुरध्वनी क्रं. ०७१२-२९८१९९१ ई-मेल आयडी-mahadessay100@gmail.com


जा. क्र.डॉ.बा.आं.स.प्र.नाग./ कार्यक्रम/ निबंध स्पर्धेचे / आस्था/ 232/२०२६-२७ दि. १०/ ०७ /२०२६

Chair prof. Dr BR Ambedkar
DIR NSS
DIR BSD

प्रति,

मा. कुलगुरु,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, गणेशखिंड,
पुणे, महाराष्ट्र - ४११००७.

**विषय : 'महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी वर्ष व महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष' निमित्त राज्यातील सर्व विद्यापीठांतर्गत (कृषी, पशु व मत्स्य आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) महाविद्यालयात निबंध स्पर्धा आयोजनाकरीता महाविद्यालयांना सुचना देणेबाबत ...**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,नागपूर ही संस्था सामाजिक न्याय विभागाचा सार्वजनिक उपक्रम आहे. मार्च,2027 मध्ये महाळ चवदार तळयाच्या सत्याग्रहाला 100 वर्ष पूर्ण होत आहे .तसेच क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे होत आहे . यांचे यानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने 'महाड चवदार तळयाचा सत्याग्रह (२० मार्च १९२७) शताब्दी' निमित्ताने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये राज्यातील सर्व विद्यापीठांतर्गत (कृषी, पशु व मत्स्य विज्ञान आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमामध्ये आपले विद्यापीठांतर्गत महाविद्यालय देखील सहभागी होणे आवश्यक आहे.

सदर स्पर्धा पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) अशा दोन स्वतंत्र गटांमध्ये आयोजित केल्या जाणार आहेत. सविस्तर DPR व कार्यपद्धती सोबत जोडली आहे.यामध्ये आपल्या विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी व्हावी, ही अपेक्षा आहे. तसेच विद्यार्थ्यांना तत्कालिन सामाजिक परिस्थितीची जाणीव व्हावी व समतेचे तत्व त्यांच्यामध्ये रुजावे हा स्पर्धा आयोजनामागचा उद्देश आहे. विद्यापीठांतर्गत जास्तीत जास्त महाविद्यालयाचा सहभाग व्हावा म्हणुन आपल्या स्तरावरुन निर्देश संबंधित महाविद्यालयांना देणे आवश्यक आहे. स्पर्धा यशस्वी होण्याच्या दृष्टिने आपल्या स्तरावरुन आपले विद्यापीठ तर्फे एक स्पर्धा समन्वय अधिकारी (Nodal Officer)' नेमावा. समन्वय अधिकारी हे सहायक कुलसचिव किंवा त्यासमकक्ष पदाचे असावेत. कृ.मा.प.

Bhame 15/07/2026

Scanned with OKEN Scanner

या संदर्भात आपल्या स्तरावरुन महाविद्यालयांना सुचना देण्याकरीता सुचनापत्रक संलग्न करण्यात येत आहे. करीता सुचना पत्रकाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन सर्व संबंधित महाविद्यालयांना मुदतीत सुचना देवून सदर उपक्रमास आपले सहकार्य लाभावे तसेच जास्तीत जास्त महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी होईल याकरीता सहकार्य करावे, ही विनंती.

सहपत्र :- सुचनापत्रक

आपल विश्वासू,

(सुरेंद्र पवार)
व्यवस्थापिकीय संचालक ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,
नागपूर

प्रतिलीपी :-माहितीस्तव सादर
१.मा .प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२.मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव
३.मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, मंत्रालय, पुणे.
४.मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,नागपूर

## सुचना पत्रक

# निबंध स्पर्धा आयोजन

महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी व महात्मा फुले जयंती द्विशताब्दी(२०० वर्ष)

निमित्त

राज्यातील सर्व विद्यापीठे व त्यांच्या अंतर्गत महाविद्यालये

(कृषी, पशु व मत्स्य विज्ञान आणि आरोग्य विद्यापीठ वगळून)

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७

| | |
|---|---|
| विभाग | डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,नागपूर |
| **कार्यक्रमाचे नाव** | निबंध स्पर्धा -२०२६-२७ |
| **उद्देश** | सामाजिक न्याय, समता व मानवी हक्क या मुल्याच्या महत्वाची महान परंपरेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये जागृत करणे |
| **स्तर** | पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) - दोन विभाग |
| **व्याप्ती** | महाराष्ट्रातील सर्व शासकीय विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये (कृषी, पशु व मत्स्य विज्ञान आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) |

Scanned with OKEN Scanner

## १. प्रस्तावना व उद्दिष्टे

महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह (दिनांक २० मार्च १९२७) हा भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक व प्रेरणादायी घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या सत्याग्रहाने अस्पृश्यतेविरुद्ध लढ्याला नवीन दिशा दिली. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले यांची द्विशताब्दी जयंती (२०० वर्ष)सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने समाज कल्याण विभागामार्फत राज्यभरातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

## मुख्य उद्दिष्टे

- महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना माहिती होणे.
- महात्मा फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.
- सामाजिक समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा प्रसार करणे.
- विद्यार्थ्यांच्या लेखन व वक्तृत्व कौशल्याचा विकास घडवणे.
- पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक व विश्लेषणात्मक दृष्टिकोन विकसित करणे.

## २. स्पर्धेचे विषय

### अ) निबंध स्पर्धा - विषय सूची

**पदवी स्तर (UG):**

३. महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह : सामाजिक क्रांतीची नांदी

**Mahad Chavdar Talya Satyagraha : The beginning of a social revolution**

**पदव्युत्तर स्तर (PG):**

४. महात्मा फुले यांची विचारधारा आणि समकालीन सामाजिक आव्हाने

**Mahatma Phule's ideology and contemporary social challenges**

### निबंध स्पर्धेसाठी नियम

- निबंध मराठी किंवा इंग्रजी भाषेत लिहिता येईल.
- पदवी गटासाठी: शब्द मर्यादा - किमान २००० ते कमाल २५०० शब्द

Scanned with OKEN Scanner

- पदव्युत्तर गटासाठी: शब्द मर्यादा - किमान ३००० ते कमाल ३५०० शब्द
- निबंध हस्तलिखित (A४ कागदावर) किंवा टाईप केलेला ऑनलाईन अपलोड करावा , शक्य नसल्यास पोस्टाने पाठवावा.
- निबंधात संदर्भसूची (Bibliography) असल्यास अतिरिक्त गुणास पात्र ठरेल. (पदव्युत्तर विद्यार्थ्यासाठी)
- साहित्यचोरी (Plagiarism) आढळल्यास स्पर्धकाचे नाव रद्द होईल.
- निबंधावर विद्यार्थ्याचे नाव, महाविद्यालय, विद्यापीठ, विभाग व वर्ग नमूद असावा. याकरिता विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यावर छायांकीत प्रती (Print Out) निघेल त्यावर निबंध लिहावा व तेच पाने अपलोड करावे.
- निबंध सुंदर ,सुवाच्च व वाचनिय अक्षरात लिहावा.

## ३. अटी व शर्ती

अ) पात्रता

- महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त (कृषी, पशु व मत्स्य विज्ञान आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) सर्व शासकीय विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील नोंदणीकृत विद्यार्थी पात्र असतील.
- पदवी (UG) चे शिक्षण घेणारे विद्यार्थी - पदवी गटात सहभाग घेतील.
- पदव्युत्तर (PG) चे शिक्षण घेणारे विद्यार्थी - पदव्युत्तर गटात सहभाग घेतील.
- एक विद्यार्थी एकाच गटात सहभागी होईल.
- विद्यार्थी स्वत: त्यांच्या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर संस्थेच्या संकेतस्थळावर (Website - **https://dbaspratishthan.in** ) स्वत:ची नोंदणी करतील. नोंदणी केल्यानंतर त्याला नोंदणी क्रमांक उपलब्ध होईल, त्याचवेळी निबंधलेखनाकरिता पाने उपलब्ध होईल, ती पाने डाऊनलोड करावे त्यावरच नोंदणी क्रमांक नमुद करुन निबंध लेखन करावे व तीच पाने अपलोड करावे.

ब) परीक्षण निकष (Evaluation Criteria)

| अ.क्र. | निकष | निबंध (गुण) |
|---|---|---|
| १ | विषयाची मांडणी व सखोलता | ३० |
| २ | भाषिक शैली व सौंदर्य | २० |
| ३ | विचारांची मौलिकता व सर्जनशीलता | २० |
| ४ | तथ्य, आकडेवारी व संदर्भांचा उपयोग | २० |
| ५ | एकत्रित निष्कर्ष | १० |
| | **एकूण गुण** | **१००** |

Scanned with OKEN Scanner

## ४. समयबद्ध कार्यक्रम (Time Bound Schedule)

| टप्पा | कार्यक्रम | जबाबदारी | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | परिपत्रक जाहीर करणे व विद्यापीठांना पत्र देणे. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर | माहे जुलै, २०२६ |
| २ | उच्च व तंत्र शिक्षण विभागास कळविणे | समाज कल्याण विभाग | माहे जुलै, २०२६ |
| ३ | विद्यापीठस्तरावर समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करणे. | संबंधित विद्यापीठ | माहे जुलै, २०२६ |
| ४ | महाविद्यालयांना सूचना पत्र देणे | विद्यापीठ समन्वय अधिकारी | माहे ऑगस्ट, २०२६ |
| ५ | ऑनलाईन नोंदणी पोर्टल सुरू | संकेतस्थळ - https://dbaspratishthan.in | माहे सप्टेंबर ,२०२६ ते ऑक्टोबर,२०२६ पर्यंत |
| ६ | विद्यार्थ्यांनी निबंध Upload करणे | महाविद्यालय | नोव्हेंबर, २०२६ पर्यंत |
| ७ | तपासणी | समाज कल्याण विभाग | जानेवारी व फेब्रुवारी, २०२७ |
| ८ | निकाल | समाज कल्याण विभाग | फेब्रुवारी, २०२७ |
| ९ | पारितोषिक वितरण समारंभ | समाज कल्याण विभाग | मार्च, २०२७ |

- राज्य स्तरावर UG व PG प्रत्येक गटासाठी स्वतंत्र परीक्षण समिती नेमण्यात येईल. (किमान ३ सदस्य)
- प्रत्येक विद्यापीठातून UG व PG या गटापैकी प्रत्येक गटातुन प्रथम ,द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात येईल.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,नागपूर या संस्थेच्या नियंत्रणाखाली राज्यस्तरीय परीक्षण समिती (3 सदस्य) गठित केली जाईल.
- अंतिम निकाल व पारितोषिक वितरण राज्यस्तरावरील एका भव्य समारंभात होईल.

Scanned with OKEN Scann

## ५. कार्यपद्धती

### टप्पा १ : विद्यापीठ स्तर

- प्रत्येक महाविद्यालय नोटीस बोर्डवर सुचना प्रदर्शित करुन विद्यार्थ्यांना स्पर्धेची माहिती देणे.
- विद्यापीठाने महाविद्यालयांना स्पर्धेत सहभागी होण्याबाबत पत्र देणे – भाग घेण्याबाबत पाठपुरावा करावा.
- विद्यापीठ समन्वय अधिकारी सर्व महाविद्यालयांशी संपर्क साधुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शवावा याकरिता प्रयत्न करावे.

## ६. ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया

- डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान विभागाच्या **https://dbaspratishthan.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी फॉर्म उपलब्ध असेल.
- नोंदणीसाठी आवश्यक माहिती: विद्यार्थ्याचे नाव, महाविद्यालय, विद्यापीठ, विभाग, वर्ष, मोबाईल नंबर, महाविद्यालय ई-मेल, विद्यापीठ नोंदणी क्रमांक (Enrolment Number) नमुद करावा
- नोंदणी यशस्वी झाल्यावर विद्यार्थ्यास युनिक Registration ID प्राप्त होईल. त्याची प्रिंट काढावी,त्याप्रिंटवर निबंध लेखन करावे व आवश्यकतेनुसार इतर A4 size आकाराचे पान संलग्न करुन निबंध लिहावे
- निबंध ऑनलाईन PDF स्वरूपात अपलोड करावा .(अधिकतम ५ MB) त्यासोबत नोंदणी केलेल्या पानाची प्रत प्रिंट काढलेली आहे. त्यापानावर सुरुवात करुन निबंध लेखन करावे व त्यासह अपलोड करावे.
- नोंदणीची अंतिम तारीख: ३१ ऑक्टोबर, २०२६
- निबंध सादर करावयाची तारीख : ०१/१२/२०२६ ते ३१/१२/२०२६

## ७. पारितोषिक संरचना

विद्यापीठस्तरीय :

| स्तर | स्पर्धा | प्रथम | द्वितीय | तृतीय | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| पदवी (UG) | निबंध | रु.१०,०००/- | रु. ७,५००/- | रु. ५,०००/- | रु. २२,५००/- |
| पदव्युत्तर (PG) | निबंध | रु.१०,०००/- | रु. ७,५००/- | रु. ५,०००/- | रु. २२,५००/- |
| | | रु. २०,०००/- | रु. १५,०००/- | रु.१०,०००/- | रु. ४५,०००/- |

* *विद्यापीठ स्तरावरील विजेत्यांना पुरस्कारासह विशेष प्रमाणपत्र देण्यात येईल.*

Scanned with OKEN Scanner

राज्यस्तरीय :

| स्तर | स्पर्धा | प्रथम | द्वितीय | तृतीय | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| पदवी (UG) | निबंध | रु.५०,०००/- | रु. ४०,०००/- | रु. ३०,०००/- | रु. १,२०,०००/- |
| | | | | | |
| पदव्युत्तर (PG) | निबंध | रु.५०,०००/- | रु. ४०,०००/- | रु. ३०,०००/- | रु. १,२०,०००/- |
| | | **रु. १,००,०००/-** | **रु. ८०,०००/-** | **रु. ६०,०००/-** | **रु. २,४०,०००/-** |

* राज्यस्तरीय विजेत्यांना पुरस्कारासह विशेष प्रमाणपत्र देण्यात येईल

## ८. विद्यापीठ समन्वय अधिकारी - जबाबदाऱ्या

- प्रत्येक विद्यापीठ एक समन्वय अधिकारी (सहायक कुलसचिव किंवा समकक्ष दर्जाचे अधिकारी) नेमतील.
- समन्वय अधिकाऱ्यांची नावे व संपर्क क्रमांक डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानकडे ७ दिवसांत कळवावेत.
- महाविद्यालयांना सूचना पत्र पाठवणे व पाठपुरावा करणे.

(सुरेंद्र पवार)
व्यवस्थापकीय संचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,
नागपूर



Scanned with OKEN Scanner